## प्रेसनोट

लां.प्र. विभाग, धुळे
दि २४.११.२०२५

**लोकसेवक वासुदेव धोंडु पाथरवट, आरेखक, सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगाव यांनी तक्रारदार यांचेकडे १५,०००/— रुपये लाचेची मागणी करुन सदर लाच स्विकारण्याचे मान्य करुन १५,०००/— रुपये लाचेची रक्कम स्वत: स्विकारल्याने गुन्हा**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** | धुळे |
| **पो. ठाणे, गुन्हा नोंद क्रमांक** | जिल्हा पेठ पो. स्टे. गुरनं. ३३४ /२०२५, जि. नंदुरबार |
| **कलम व गुन्हा दाखल दिनांक** | भ्र.प्र. कायदा कलम ७ प्रमाणे, दि. २४.११.२०२५ |
| **आरोपीचे नांव, वय व कार्यालय** | वासुदेव धोंडु पाथरवट, वय— ५३, आरेखक, सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगाव, रा— प्लॉट नं. ५५, मोहित नगर, विश्वकर्मा भवन, जळगाव रोड, भुसावळ, जि. जळगाव |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | १५,०००/— रुपये |

**<u>थोडक्यात हकिगत</u> :—** तक्रारदार यांनी मौजे वाकडी, ता. जामनेर, जि. जळगाव येथील गट नं. १३९/१/पैकी/अ क्षेत्र २७ आर शेत जमिनीचे क्षेत्रापैकी १२२५ चौ.मी. क्षेत्रामध्ये नियोजित पेट्रोलपंप सुरू करण्याकरीता भाडे तत्वावर करारनामा करून घेतले असुन सदर क्षेत्रात इंडियन ऑईल कंपनी, छत्रपती संभाजीनगर यांनी सदर जागेत पेट्रोलपंप सुरू करण्यासाठी तक्रारदार यांना अलॉटमेंट लेटर (एल ओ वाय) देवुन सदर क्षेत्रात पेट्रोलपंप सुरू करण्यास नाहरकत प्रमाणपत्र मिळण्याकरीता मा.जिल्हाधिकारी, जळगाव यांना पत्र दिले होते. त्यावरून मा. जिल्हाधिकारी, जळगाव यांनी मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगाव यांना पत्र देवुन सदर शेत जमिनीत नविन पेट्रोलपंप सुरू करण्यासाठी नाहरकत प्रमाणपत्र देण्यात यावे अगर कसे ? याबाबत अभिप्राय मागविला होता.

सदरचा अभिप्राय/नाहरकत मिळणेकरीता तक्रारदार व त्यांचे मित्र यांच्यासह सदर कार्यालयात वेळोवेळी जावुन संबंधीत कामकाज पाहणारे आलोसे यांची भेट घेवुन त्यांना नाहरकत प्रमाणपत्र लवकरात लवकर मिळणेकरीता विनंती केली असता आलोसे यांनी तक्रारदार यांचें काम करून देणे करीता २,०००/—रू घेवुन काम झाल्यावर १५,०००/—रू दयावे लागतील असे सांगितले होते. त्यानंतर दि. २१.११.२०२५ रोजी आलोसे यांनी तक्रारदार यांचे मित्र यांना फोन करून तक्रारदार यांच्याकडे एन ओ सी देणेकरीता १५,०००/—रू लाच मागणी केल्याचा निरोप दिल्याबाबत तक्रारदार यांनी दुरध्वनीव्दारे माहिती दिली होती. त्यावरून धुळे ला.प्र.विभागाच्या पथकाने जळगाव येथे जावुन तक्रारदार यांची भेट घेवुन त्यांची तक्रार लिहुन घेतली होती.

तक्रारदार यांच्या तक्रारीची आज दि. २४.११.२०२५ रोजी पडताळणी केली असता पडताळणी दरम्यान आलोसे यांनी तक्रारदार यांच्याकडे पंचांसमक्ष १५,०००/—रू लाचेची मागणी केली होती. त्यानंतर सापळा आयोजित केला असता आलोसे यांनी तक्रारदार यांच्याकडुन पंचांसमक्ष १५,०००/— रुपये लाचेची रक्कम स्वत: स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

| | |
|---|---|
| **सापळा अधिकारी** | सचिन साळुंखे, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि. धुळे<br>मो. नं. ९८३४२०२९५५, ९४०३७४७१५७ |
| **तपास अधिकारी** | पद्मावती कलाल, पोलीस निरीक्षक |
| **सापळा पथक** | पोहेकॉ. राजन कदम, प्रविण मोरे, संतोष पावरा, पोकॉ प्रशांत बागुल, मकरंद पाटील, प्रविण पाटील, सागर शिर्के, प्रितेश चौधरी, रेश्मा परदेशी, पोहेकॉ. सुधीर मोरे, जगदिश बडगुजर |
| **मार्गदर्शन** | १) मा. श्री भारत तांगडे, पोलीस अधीक्षक<br>२) मा. श्री. माधव रेडडी, अपर पोलीस अधीक्षक<br>३) मा. श्री. सुनिल दोरगे, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक |

पोलीस उप अधिक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो सत्यमेव जयते धुळे.

**लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकिय/ निम शासकिय अधिकारी / कर्मचारी अथवा खाजगी पंटर यांनी काम करुन देण्यास लाचेची मागणी केल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे संपर्क साधावा.**

**<u>"लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे आपले सेवेशी सदैव तत्पर"</u>**

**(सचिन साळुंखे)**
**पोलीस उपअधीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,धुळे.**

**संपर्क पत्ता** :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे
**संकेतस्थळ** :— acbmaharashtra.gov.in
**ईमेल** :— dyspacbdhule@gmail.com
**टोलफ्री कमांक** :— १०६४ **दुरध्वनी कमांक** :— ०२५६२—२३४०२०

Scanned with OKEN Scanner